आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

४ डिसेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब/ २१वे मुख्यमंत्री म्हणून उद्या घेणार शपथ.

- मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी जागतिक बँकेकडून महाराष्ट्राला नव्यानं कर्ज मंजुरी

- २४ व्या नौदल दिनानिमित्त भारतीय नौदलाचा आज ओडिशात पुरी इथं राष्ट्रपतींच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम

- अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांचा आज राज्यसभेतून सभात्याग.

**आणि**

- महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कारवाईत तस्करीचं सोळा किलो मेफेड्रोन आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबतचं कुतूहल आता देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानं संपलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत ते उद्या महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. भाजपाच्या गाभा समितीच्या आज झालेल्या बैठकीत भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी फडणवीस यांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी मुख्य निरीक्षक

म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यावेळी उपस्थित होते. नवनिर्वाचित आमदार चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व आमदारांनी पाठिंबा दिल्यानंतर पक्षनेतेपदी फडणवीस यांची निवड जाहीर करण्यात आली. देवेवंद्र फडणवीस यांनी यावेळी जनतेचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. ते म्हणाले....

**बाईट- देवेंद्र फडणवीस**

महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी उद्या संध्याकाळी मुंबईच्या आझाद मैदानावर होणार आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ फडणवीस तिसऱ्यांदा घेणार आहेत, तसंच उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांचा शपथविधीही होणार आहे.

**<><><><><>**

विकास प्रक्रियेत मदत करण्यासाठी जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळाने महाराष्ट्राला ३ डिसेंबर रोजी नव्यानं कर्ज मंजुर केलं आहे. राज्यातल्या मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या जागिक बँकेच्या उपक्रमाचा हा भाग आहे. विकासाची संधी निर्माण करणं, खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणं हे याचं उद्दिष्ट आहे. ५० हजार **कोटींची** महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तरीही राज्याच्या जीडीपीपैकी पन्नास टक्के उत्पादन केवळ सात जिल्ह्यांमध्ये होतं. त्यामुळे राज्यातल्या इतर जिल्ह्यांच्या विकासाच्या गतीमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. जिल्हा प्रशासनासमोरील आव्हानं आणि खासगी क्षेत्रांकडून शासकीय सेवांसाठी होणारा अपुरा पुरवठा यामुळे जिल्ह्यांचा विकास खुंटतो. राज्याचं एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट साध्य करायचं असेल तर सर्व जिल्ह्यांचा विकास होणं आवश्यक आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यात विकासाचं उद्दिष्ट

साध्य करायला हातभार लागेल, असं जागतिक बँकेचे भारतातले संचालक ऑगस्ते तॅनो कौम यांनी सांगितलं.

<><><><><>

आज नौदल दिन. १९७१ मध्ये ऑपरेशन ट्रायडेंट दरम्यान भारतीय नौदलानं चार पाकिस्तानी जहाजं बुडवली होती आणि शेकडो पाकिस्तानी नौदलाचे जवान मारले होते. भारतीय नौदलाची ही कामगिरी आणि शौर्याचा आदर करण्यासाठी दरवर्षी चार डिसेंबर हा दिवस साजरा केला जातो. भारतीय नौदलाचे शूर जवान अतुलनीय धैर्यानं आणि समर्पणानं देशाच्या समुद्राचं रक्षण करतात त्यांचा आणि नौदलाच्या समृद्ध सागरी इतिहासाचा अभिमान आहे, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरून नौदलाच्या जवानांना शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय नौदल हे देशाच्या सुरक्षा व्यवस्थेचा आणि सागरी सुरक्षेचा मजबूत आधारस्तंभ आहे, अशा शब्दात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नौदलाच्या जवानांना आणि त्यांच्या कुटुंबियांना नौदल दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

२४ व्या नौदल दिनानिमित्त भारतीय नौदल आज ओडिशा इथल्या पुरी इथल्या 'ब्ल्यू फ्लॅग बीचवर' ऑपेरेशनल प्रात्यक्षिकाद्वारे त्यांचं सामर्थ्य आणि पराक्रमाचं सादरीकरण करेल. या कार्यक्रमाला सर्वोच्च सशस्त्र दलाच्या कमांडर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसंच ओडिशाचे राज्यपाल आणि मुख्यमंत्री, केंद्रीय आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री, राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी, लष्करी मान्यवर आणि स्थानिक नागरिक उपस्थित राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

<><><><><>

बीएसएनएल या तोट्यात असलेल्या कंपनीला केंद्र सरकारनं दिलेल्या पुनरुज्जीवनानंतर कंपनीला नफा झाल्याची माहिती केंद्रीय संपर्क मंत्री

ज्योतिरादित्य सिंधिया यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सरकारनं बीएसएनएलच्या ५० हजारांहून जास्त कर्मचाऱ्यांची जबाबदारी घेतल्याचंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

संसद सदस्यांनी भवनाच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शनं करू नयेत, अशी विनंती लोकसभा सचिवालयानं केली आहे. अशा निदर्शनांमुळे सदस्यांना कामकाजासाठी सभागृहात जायला अडथळा होतो तसंच त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न उद्भवू शकतो, असं सचिवालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

रेल्वेच्या सुरक्षेसाठी ‘कवच’ ही स्वयंचलित यंत्रणा तयार करण्यात आल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान दिली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी रेल्वेचे रुळ सातत्यानं अद्ययावत केले जात आहेत. तसंच, प्रत्येक प्रवाशाला, प्रवासासाठी अनुदान मिळण्याचं रेल्वे मंत्रालयाचं उद्दिष्ट असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांनी आज राज्यसभेतून सभात्याग केला. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर एमएसपी, फेंजल चक्रिवादळ, संभल हिंसाचार आणि अदानी लाचखोरी प्रकरणावर विरोधी पक्षांनी सादर केलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर काँग्रेस आणि आपच्या सदस्यांनी एमएसपी कायद्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. गेल्या आठवड्यात विरोधकांनी गोंधळ घालण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव का दिला नाही, या धनखड यांच्या प्रश्नावर काही विरोधकांनी आक्षेप घेतला. तर काँग्रेसचे सदस्य प्रमोद तिवारी यांनी सरकारवर एमएसपी संदर्भातल्या

मागण्या पूर्ण न केल्याचा आरोप करत या संबंधित कायदा करण्याची विनंती केली. त्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्ष सदस्यांसह इतर सदस्यांनी सभात्याग केला.

<><><><><>

अमृतसरमध्ये सुवर्ण मंदिरात शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा केंद्रीय मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी निषेध केला आहे. संसद भवनाबाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या घटनेच्या चौकशीची मागणी केली. पंजाबमध्ये शांतता बिघडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. बादल यांच्यावर गोळीबार करणारा नारायण सिंग चौरा हा हल्लेखोर बुरैल इथे घडलेल्या घटनेचा सूत्रधार होता, त्यानेच तीन दहशतवाद्यांना तुरुंगातून पळून जायला मदत केल्याचा आरोप बिट्टू यांनी केला आहे.

<><><><><>

डीआरआय अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयानं तस्करीच्या एका प्रकरणात सोळा किलो मेफेड्रोन हा सायकॅट्रॉपीक पदार्थ आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. १९८५ सालच्या NDPS या कायद्याच्या तरतुदीनुसार या प्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. हैद्राबादहुन मुंबईला जाणाऱ्या एका बस मधून जाणारे दोन प्रवासी मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी करत असल्याची गुप्त माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या आधारावरून पाळत ठेवून काल पहाटे या दोन प्रवाशांना अधिकाऱ्यांनी अटक केली. त्यानंतर मुंबईतून आणखी तीन संशयितांना रोख रकमेसह ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

तेलंगणातल्य़ा अनेक भागात आज सकाळी भूकंपाचे सौम्य धक्का जाणवला. रिक्टर मापकावर त्याची तीव्रता पाच पूर्णांक तीन दशांश नोंदली गेली. सकाळी ७ वाजून २७ मिनिटांनी जाणवलेल्या या भूकंपाचं केंद्र मुलुगु जिल्ह्यात होतं. करीमनगर, पेद्दापल्ली, जनगाव,महबूबाबाद, हनुमकोंडा वरंगळ, आणि भद्राद्री कोथागुडम या जिल्ह्यांमधे हा धक्का जाणवल्याचं राष्ट्रीय भूगर्भ संशोधन केंद्रानं सांगितलं. भूकंपात कोणतीही जीवित किंवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही. महाराष्ट्रात **चंद्रपूर** आणि **गडचिरोली** जिल्ह्याच्या अनेक भागातही हा धक्का जाणवल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

**<><><><><>**

सिंगापूर इथे सुरु असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या डी. गुकेश याचा सामना आज दुपारी चीनच्या डिंग लायरेन याच्याशी होणार आहे. दुपारी २ वाजून २० मिनिटांनी हा सामना सुरू होईल. ही या स्पर्धेची आठवी फेरी आहे. काल गुकेश आणि डिंग यांच्यात झालेला सातव्या फेरीचा सामना बरोबरीत सुटला होता.

**//<><><><><>//**